# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:19.10.2025** **वार:रविवार**

---

1. सुधारित वस्तू आणि सेवा कराचे संपूर्ण लाभ मिळण्यासाठी उत्पादनांच्या किंमतीवर अर्थ मंत्रालयाचं लक्ष - केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांची माहिती
2. पुरामुळे गेल्या महिन्यात झालेल्या नुकसानीच्या भरपाईपोटी आणखी सव्वा 3 हजार कोटी रुपयांच्या मदतीचा शासन निर्णय जाहीर
3. धनत्रयोदशीचा सण उत्साहात साजरा; अयोध्येत आज दीपोत्सव आणि
4. भारत ऑस्ट्रेलिया दरम्यान क्रिकेट मालिकेतील मर्यादित षटकांचा पहिलं सामना आज पर्थ इथं, तर महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत इंदूर इथं भारताचा सामना इंग्लंडशी

**निर्मला सितारामन जीएसटी**

सुधारित वस्तू आणि सेवा कराचे संपूर्ण लाभ अंतिम ग्राहकापर्यंत पोहोचण्याच्या दृष्टीने, 54 उत्पादनांच्या किंमतीवर अर्थ मंत्रालय लक्ष ठेवून असल्याचं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. या सर्व उत्पादनांवर सुधारित जीएसटी लागू झाला असल्याचंही त्या म्हणाल्या. दिल्लीत काल झालेल्या जीएसटी बचत उत्सवासंदर्भात आयोजित संयुक्त पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. नव्या जीएसटीची अंमलबजावणी ही केंद्र सरकार आणि जीएसटी परिषद यांच्यातील सहकार्याचं प्रतिबिंब असून, सामान्य नागरिकांना त्याचे अधिकाधिक फायदे मिळतील असंही त्या म्हणाल्या. दर कपात, प्रक्रिया सुलभीकरण, जीएसटीचे दोनच टप्पे ठेवणे, तसंच वर्गीकरणासंबंधीच्या समस्या सोडवणे या गोष्टी मुदतीपूर्वी पूर्ण झाल्या आहेत. या सुधारणांमुळे देशाच्या अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळाली आहे, असं त्यांनी सांगितलं.

**प्रतिक्रीया**

केंद्र सरकारनं 22 सप्टेंबर पासून विविध वस्तूंवरील जीएसटी कमी केल्याचा फायदा शेतकऱ्यापासून उद्योगापर्यंत आणि घरापासून व्यवसायापर्यंत सर्वांना मिळत आहे. आत्मनिर्भर भारत योजनेसही याची मदत होत आहे. दसरा आणि दिवाळी सणांच्या मुहूर्तावर केंद्र सरकारनं जीएसटी कमी केल्यानं हे सण उत्साहात साजरे होत आहेत. GST कमी झाल्याबद्दल सांगली जिल्ह्यातील काही व्यावसायिक, उद्योजक, ग्राहक आणि शेतकरी यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. यावेळी औषध आणि सौन्दर्यप्रसाधन विक्रेते नवनाथ जगताप म्हणाले.....

**महाराष्ट्रात नाही पूर्ण भारतामध्ये जे आता आपलं जे नवीन सरकार आलंय ह्या नवीन सरकारने जीएसटी मध्ये सुधारणा करून जीएसटी त्वो जो काढलेला आहे ह्याचा सर्वसामान्य नागरिकांना सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत लागणाऱ्या वस्तूंमध्ये टूथपेस्ट, साबण, कॉस्मेटिक मध्ये महिलांसाठी दिलासा दिलेला आहे. या सरकार सर्व वस्तूंच्या किमती एमआरपी ह्या जीएसटी सवलत दिल्यामुळं जे आता अठरा टक्के जीएसटी होती ते डायरेक्ट पाच टक्क्यावर जीएसटी केलेली आहे. एका प्रकारे दिवाळी आणि दसऱ्यानिमित्त केंद्र सरकारकडनं दिवाळीचा मोठा बोनसच दिलेला आहे हे म्हटलं तरी काही हरकत नाहीये. आणि ह्याचा सर्वसामान्य नागरिकांच्या खिशाला परवडेल असं बजेट झालेलं आहे.**

**पूरग्रस्त मदत**

राज्य सरकारनं गेल्या महिन्यात अतिवृष्टी आणि पुराचा फटका बसलेल्या शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी आणखी 3 हजार 258 कोटी रुपयांपेक्षा अधिक रकमेच्या मदतीचा शासन निर्णय काल जाहीर केला. राज्यभरातल्या 24 जिल्ह्यातल्या 33 लाख 65 हजार 544 शेतकऱ्यांना या मदतीचा लाभ मिळणार आहे. यामध्ये नागपूर, अमरावती, पुणे, नाशिक आणि कोकण प्रशासकीय विभागातल्या

शेतकऱ्यांचा समावेश आहे. या जिल्ह्यांमधल्या 27 लाख 59 हजार हेक्टर पेक्षा अधिक शेतीचं नुकसान झाल्यानं ही नुकसान भरपाई दिली जाणार आहे.

**आदी कर्मयोगी अभियान-गडचिरोली**

आदी कर्मयोगी अभियानात गडचिरोली जिल्ह्यानं उत्तम कामगिरी केल्याबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी जिल्हाधिकारी अविशांत पंडा यांना नुकताच नवी दिल्लीत पुरस्कार प्रदान केला. या अभियानात जिल्ह्यानं नेमकी कोणती कामगिरी केली, त्याचा हा वृत्तांत आमच्या प्रतिनिधिकडून....

**विकसित भारताच्या संकल्पनेशी सुसंगत स्थानिक योजना, ग्रामपातळीवर नेतृत्वनिर्मिती आणि प्रशासनाच्या प्रतिसादानं शेवटच्या घटकापर्यंत योजनांचा लाभ पोहचविण्याच्या कामाला जिल्ह्यात हळूहळू गती मिळत गेली. आतापर्यंत गडचिरोली जिल्ह्यातील 12 तालुक्यांमध्ये 441 गावांचं क्लस्टर तयार करण्यात आलं. गावांपर्यंत योजना पोहचविण्यासाठी प्रशिक्षक तयार करण्यात आले, 553 ग्रामसभा घेण्यात आल्या.**

**घनकचरा व्यवस्थापन, स्वच्छता, पथदिवे, कौशल्य विकास प्रशिक्षण, डिजीटल पायाभूत सुविधा, दळणवळण, सिंचन आणि शेतीला लागणाऱ्या तांत्रिक अवजारांसाठी मदत, सौर उर्जेवरील पाणी उपसणारं साहित्य, शेतमाल उत्पादकांना थेट ग्राहक आणि विक्रेत्यांसोबत जोडणं, गोदाम निर्मिती, वीज आणि पिण्याचं शुद्ध पाणी, फिरतं वैद्यकीय पथक, कुपोषण आणि हिवतापाचं प्रमाण कमी करणं, जिल्हा परिषद आणि आश्रमशाळांमध्ये डिजिटल शिक्षण इत्यादीवर भर देण्यात येत आहे.**

**शिवाय तेंदू, बांबू, मध, आवळा या वनातून मिळणाऱ्या पदार्थांना ब्रँडिंग करणं, वनहक्क पट्ट्यांचं जास्तीत जास्त वाटप करणं अशी कामंही हातात घेण्यात येत आहेत. आतापर्यंत 522 मोबाईल मनोरे उभारण्यात आले. मागील 3 महिन्यांमध्ये 453 ग्रामपंचायतींना भारतनेटशी जोडण्यात आलं. जिल्ह्यात 553 आदी सेवा केंद्रं स्थापन करुन सर्व गावांचा ग्राम विकास आराखडा तयार करण्यात आला. या कामाची दखल केंद्रस्तरावर घेऊन जिल्ह्याचा गौरव करण्यात आला. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी, जयंत निमगडे, गडचिरोली.**

**धनत्रयोदशी**

राज्यासह देशभरात काल धनत्रयोदशीचा सण उत्साहात साजरा करण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी धनत्रयोदशीनिमित्त देशवासियांना काल शुभेच्छा दिल्या. पंतप्रधानांनी समाज माध्यमावरील एका संदेशात सर्वांच्या आनंद, समृद्धी आणि आरोग्यासाठी प्रार्थना केली. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह तसंच संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनीही काल जनतेला शुभेच्छा दिल्या.

**राज्यपाल**

राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी दिवाळीनिमित्त सर्व नागरिकांना शुभेच्छा दिल्या आहेत तसंच नागरिकांना स्वदेशी उत्पादनं वापरण्याचं आवाहन केलं आहे. पर्यावरण रक्षण, नैसर्गिक साधनसंपत्तीचा आदर आणि शाश्वत शेतीसारख्या जीवनमूल्यांचा अवलंब करून उज्ज्वल, समृद्ध आणि स्वावलंबी भारताच्या उभारणीत सहभागी होण्याचा संदेश त्यांनी दिला.

**दीपोत्सव**

अयोध्येत आज दीपोत्सव साजरा होत आहे. शरयू नदीच्या 56 घाटांवर सुमारे 26 लाख दिवे उजळणार असून भाविकांचा उत्साह शिगेला पोहोचला आहे.

**अन्न तपासणी**

अन्न आणि औषध प्रशासन विभागामार्फत राज्यात 'सण महाराष्ट्राचा, संकल्प अन्न सुरक्षिततेचा' हे विशेष तपासणी अभियान राबविण्यात येत आहे. या अंतर्गत राज्यात सुमारे 3 हजार आस्थापनांची तपासणी करण्यात आली. तपासणीमध्ये दूध, खवा, खाद्यतेल, तूप, मिठाई, सुकामेवा, चॉकलेट्स, भगर आणि अन्य अन्नपदार्थांचे नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले. या तपासणीत अनियमितता आढळलेल्या एक हजार 431 आस्थापनांना सुधारणा नोटीस देण्यात आली असून 48 आस्थापनांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत, अशी माहिती अन्न आणि औषध प्रशासन विभागानं दिली आहे.

**नेटपरीक्षा**

सहायक प्राध्यापक पदासाठी आवश्यक असलेल्या यूजीसी नेट परीक्षेचं वेळापत्रक जाहीर करण्यात आलं आहे. नेट परीक्षा दिनांक 31 डिसेंबर 2025 ते 7 जानेवारी 2026 दरम्यान देशभरातील विविध परीक्षा केंद्रांवर होणार आहे, अशी माहिती NTA अर्थात नॅशनल टेस्टिंग एजन्सीद्वारे देण्यात आली. या परीक्षेसाठी ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरू असून, अर्ज भरण्याची अंतिम तारीख 7 नोव्हेंबर आहे. परीक्षा कोणत्या शहरांमध्ये आणि कोणत्या केंद्रांवर होईल, याची यादी परीक्षेच्या 10 दिवस आधी अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाईल. याबाबत सविस्तर माहिती यूजीसीच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**नौदल**

महाराष्ट्र नौदल क्षेत्राचा पदभार रिअर ॲडमिरल शंतनू झा यांनी स्वीकारला आहे. आयएनएस कुंजली इथं काल झालेल्या समारंभात रिअर ॲडमिरल अनिल जग्गी यांच्याकडून झा यांनी पदभार स्वीकारला. ते राष्ट्रीय संरक्षण अकादमीच्या 1993 च्या तुकडीतील अधिकारी आहेत. झा हे नौसेना पदकाचे मानकरी आहेत.

**रेल्वे**

रेल्वेच्या कामकाजाशी संबंधित दिशाभूल करणारे व्हिडिओ सामायिक करणाऱ्या सोशल मीडिया हँडल्सवर भारतीय रेल्वेनं कठोर कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे. सणासुदीच्या काळात काही सोशल मीडिया हँडल्स जुने किंवा दिशाभूल करणारे व्हिडिओ प्रसारित करत असल्यानं प्रवाशांमध्ये गोंधळ निर्माण झाला असल्याचं रेल्वे मंत्रालयानं एका निवेदनात म्हटले आहे. मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, अशा 20 हून अधिक सोशल मीडिया हँडल्सची ओळख पटवली आहे. रेल्वे प्रशासनानं या हँडल्सविरुद्ध एफआयआर दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. प्रवाशांना रेल्वेच्या अधिकृत सूचना आणि मंत्रालयाच्या सोशल मीडिया हँडल्सवरच अवलंबून राहण्याचं आवाहनही मंत्रालयानं केलं आहे.

**नंदुरबार अपघात**

नंदुरबार जिल्ह्यात अस्तंभा यात्रेवरुन परतणाऱ्या भाविकांची गाडी चांदशैली घाटातील दरीत कोसळून झालेल्या अपघातात 8 जणांचा मृत्यु झाला, तर 27 जण जखमी झाले आहेत. अपघातातील 27 जखमींपैकी 15 जणांना जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आलं असून 13 जणांवर तळोदा उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरु आहेत. मृत आणि जखमीमध्ये नंदुरबार तालुक्यातील घोटाणे गावातल्या भाविकांची संख्या सर्वाधिक आहे.

**क्रिकेट**

पर्थ इथं भारत आणि ऑस्ट्रेलिया दरम्यान पुरुषांच्या क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतील मर्यादित षटकांचा पहिला सामना आज होणार असून या दौऱ्यात पन्नास षटकांच्या 3 सामन्यांचा समावेश आहे. त्यानंतर 20 षटकांच्या 5 सामन्यांच्या मालिकेला सुरुवात होईल. महिलांच्या विश्वचषक क्रिकेट स्पर्धेतील भारत विरुद्ध इंग्लंड हा सामना आज इंदूर इथं खेळवला जाईल.

**हवामान**

कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी आज पावसाची शक्यता असून विदर्भात हवामान कोरडं राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

# नमस्कार